किशोर वयीन मुलींचे सक्षमीकरण (SAG) या केंद्रपुरस्कृत योजनेसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत केलेला निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.
(केंद्र हिस्सा ५०% व राज्य हिस्सा ५०%)

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबाावि-२०१९ /प्र.क्र.११६ /का.५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १ ऑगस्ट,२०१९.

वाचा :- (१) वित्त विभाग,परिपत्रक क्रमांक -अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ०८ जुलै,२०१९.
(२) शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१८/प्र.क्र.५९/का-५, दिनांक १ फेब्रुवारी,२०१९.

प्रस्तावना :-

किशोरवयीन मुलींकरिता योजना (SAG) ही केंद्रपुरस्कृत योजना राज्यातील सर्व जिल्हयातील वय वर्ष ११ ते १४ या वयोगटातील शाळाबाहय मुलींकरीता राबविण्यात येत आहे. सदर योजना ही राज्यात आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई या कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे. या योजनेकरीता केंद्र व राज्य हिश्याच्या निधीचे प्रमाण हे ५०% : ५०% असे ठरविण्यात आलेले आहे.

किशोरवयीन मुलींकरिता योजना (SAG) या केंद्रपुरस्कृत योजनेखालील आहार खर्चासाठी सन २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या राज्याच्या अर्थसंकल्पात केंद्र हिस्सा ५०% (लेखाशिर्ष २२३६ १८०२) रु.८,१५,१४,०००.०० व समरुप राज्य हिस्सा ५० % (लेखाशिर्ष २२३६१८११) रु.८,१५,१४,०००.०० इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

वित्त विभागाने योजनांवरील माहे डिसेंबर,२०१९ पर्यंतचा खर्च भागविण्यासाठी अर्थसंकल्पीत तरतुदीच्या ६०% इतकी तरतूद वितरीत व खर्च करण्यास उपरोक्त संदर्भीत क्रमांक (१) च्या दिनांक ०८ जुलै, २०१९ च्या परिपत्रकानुसार मान्यता दिली आहे. त्यानुसार या योजनेकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता अर्थसंकल्पीत तरतूद वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

किशोरवयीन मुलींकरिता योजना (SAG) या केंद्रपुरस्कृत योजनेखालील आहार खर्चासाठी सन २०१९-२० आर्थिक वर्षाकरीता अर्थसंकल्पीत केंद्र हिस्सा ५०% (मागणी क्रमांक एक्स-१ लेखाशिर्ष सांकेतांक २२३६ १८०२) या खालील रु.८,१५,१४,०००.०० तरतूदीच्या ६०% म्हणजेच रु.४,८९,०८,४००.०० व समरुप राज्य हिस्सा ५० % (मागणी क्रमांक एक्स-१ लेखाशिर्ष सांकेतांक २२३६१८११) तरतूदीच्या ६०% म्हणजेच रु.४,८९,०८,४००.०० अशी एकूण रु. ९,७८,१६,८००.०० (अक्षरी रुपये नऊ कोटी अठ्ठयाहत्तर लक्ष सोळा हजार आठशे फक्त) इतकी तरतूद वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

किशोरवयीन मुलींकरिता योजना (SAG)या केंद्रपुरस्कृत योजनेकरीता खर्चाचे लेखाशिर्ष मागणी क्रमांक एक्स-१	सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूद	आयुक्त,ए.बा.वि.से.यो., नवी मुंबई यांना योजनेवरील खर्चाकरीता वितरीत व खर्च करण्यास मान्यता द्यावयाची तरतूद (६०%)
२२३६ १८०२ **(केंद्रहिस्सा ५०%)**	रु.८,१५,१४,०००.००	रु.४,८९,०८,४००.००
२२३६१८११ **(राज्य हिस्सा ५०%)**	रु.८,१५,१४,०००.००	रु.४,८९,०८,४००.००
एकूण	रु.१६,३०,२८,०००.००	रु. ९,७८,१६,८००.००

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०११५५१४९७५३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.08.01 16:00:05 +05'30'

(ला.रा.गुजर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन,मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य, मंत्रालय, मुंबई-३२
६) सचिव (महिला व बालविकास विभाग), यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
९) सर्व जिल्हाधिकारी.
१०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
११) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास.
१२) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
१३) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी).
१४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२)/ वित्त विभाग (व्यय-६) मंत्रालय, मुंबई.
१९) कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी या योजने खालील आयुक्त एबाविसेयो यांना मंजूर केलेला निधी BDS वर वितरीत करावा.
२०) निवड नस्ती (कार्यासन-५), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.